अवर सचिव पदावरून
उपसचिव पदावर तदर्थ
पदोन्नती देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांक :- संकिर्ण-२०१८/ प्र.क्र.१४० (भाग-१ (१))/का.१४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३१ मे, २०१९

आदेश

प्रस्तावना :-

सरळसेवा कक्ष अधिकारी तसेच पदोन्नत कक्ष अधिकारी यांनी "मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाच्या सन १९८६ ते २००० या कालावधीतील दिनांक १ जानेवारी रोजीच्या परस्पर सेवा ज्येष्ठतेबाबत" मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे "W.P.NO. २९८६/२०००, W.P.NO. २९८२/२०००, W.P.NO. ४९५८/२००३ आणि W.P.NO. ३३७४/ २०११" मा. उच्च न्यायालयाने दि.०६.०८.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार कक्ष अधिकारी संवर्गाच्या सन १९८६ पासूनच्या ज्येष्ठतासूच्या सुधारित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी दि.१२.१०.२०१८ च्या आदेशान्वये गट (Cell) स्थापन करण्यात आला आहे. सन १९८६ ते १९९५ या कालावधीच्या कक्ष अधिकारी संवर्गाच्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूच्या प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. त्यापुढील कालावधीच्या ज्येष्ठतासूच्या प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरू आहे. तथापि, १९८६ ते आजपर्यंत अशा एकूण ३२ वर्षाच्या कालावधीतील ज्येष्ठतासूच्या सुधारित करण्याचे क्लिष्ट व वेळखाऊ स्वरूपाचे काम असल्यामुळे त्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे या काळात मंत्रालयातील उप सचिव सारख्या वरिष्ठ दर्जाची महत्वाची पदे रिक्त होत असून त्याचा विपरीत परिणाम शासनाच्या कामकाजावर व परिणामी जनतेच्या विकास कामावर होत आहे. ही बाब विचारात घेऊन उपसचिव पदावरील पदोन्नत्या ह्या अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात सध्या अस्तित्वात असलेल्या अवर सचिवांच्या दि.३१.०३.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या ज्येष्ठतासूचीच्या आधारे प्रशासकीय निकड विचारात घेऊन लोकहितास्तव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

आदेश :-

मंत्रालयीन विभागातील खालील अवर सचिवांना या आदेशाच्या दिनांकापासून उपसचिव पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागामध्ये करण्यात येत आहे.-

अ. क्र.	अवर सचिवांचे नाव	जाती प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचा विभाग
१	२	३	४	५
१	श्री.अ.वि.कदम	खुला	सामान्य प्रशासन विभाग	नियोजन विभाग
२	श्री.मु.प्र.देशपांडे	खुला	गृह विभाग (प्रतिनि- निबंधक तथा सहायक प्राध्यापक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, धरमपेठ, नागपूर)	प्रपत्र बढती- उप सचिव, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ
३	श्री.म.मो.पाटील	खुला	नगर विकास विभाग	नगर विकास विभाग

अ. क्र.	अवर सचिवांचे नाव	जाती प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचा विभाग
४	श्री.शि.ना.मोहोड	खुला	सामान्य प्रशासन विभाग	गृह विभाग
५	श्री.सं.तु.घाडगे	खुला	सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग (प्रतिनि-मा.मुख्यमंत्री सचिवालय)	प्रपत्र बढती- उपसचिव, मा.मुख्यमंत्री सचिवालय
६	श्री.प.ब.जकीकोरे	खुला	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
७	श्री.गो.भ.शिंदे	खुला	सार्वजनिक बांधकाम विभाग	वित्त विभाग
८	श्री.ज.बा.कुलकर्णी	खुला	सामान्य प्रशासन विभाग	गृह विभाग
९	श्री.उ.म.मदन	खुला	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग	सामान्य प्रशासन विभाग
१०	श्री.प्र.ल.दराडे	भज-ड	सार्वजनिक आरोग्य विभाग	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
११	श्री.ए.का.गागरे	अज	सामान्य प्रशासन विभाग (प्रतिनि-राज्यमंत्री)	सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
१२	श्री.रा.म.गेंगजे	अज	अल्पसंख्याक विकास विभाग	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१३	श्री.ज.जी.वळवी	अज	वित्त विभाग	सामान्य प्रशासन विभाग

२. सर्वश्री मु.प्र.देशपांडे व सं.तु.घाडगे यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ४०, परिशिष्ट-२, अट क्र.१८ नुसार तदर्थ स्वरूपात प्रपत्र बढती (पदोन्नती) देण्यात येत आहे. सदर तरतुदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा राहील. त्यानंतर सदर अधिकाऱ्याने मंत्रालयीन विभागात हजर होणे आवश्यक राहील.

३. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधि व न्याय विभागाने दि.२८.१२.२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी, अशा सूचना सा.प्र.वि./कार्यासन १६-ब ने दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. त्यानुषंगाने अ.क्र.१० ते १३ वरील अवर सचिव अनुक्रमे सर्वश्री प्र.ल.दराडे, ए.का.गागरे, रा.म.गेंगजे व ज.जी.वळवी यांनी शासन निर्णय दि.२५.०५.२००४ मधील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ घेतलेला नाही.

३. सदर अधिकाऱ्यांची उप सचिव पदावरील तदर्थ पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन असून पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटींच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.-

(अ) सदर अधिकाऱ्यांविरुध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही.

(ब) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी उप सचिव संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम अधिकाऱ्यांला पदावनत करण्याच्या अधीन सदर तदर्थ पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

(क) सदरची पदोन्नती अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात प्रशासकीय निकड म्हणून लोकहितास्तव देण्यात आली आहे.

(ड) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(इ) सदरची पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ व विशेष अनुमती याचिका क्र.२५१८१/२०१८ व त्यातील आय.ए. क्र.२५९०/२०१९ मध्ये होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. मा.उच्च न्यायालयाने दि.०६.०८.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार कक्ष अधिकारी संवर्गाच्या सन १९८६ पासूनच्या ज्येष्ठतासूच्या सुधारित करण्यात येत असल्याने सदर पदोन्नत्या ह्या कक्ष अधिकारी संवर्गाच्या सुधारित ज्येष्ठतासूच्यांच्या अधीन राहून देण्यात येत असल्याने पदोन्नत होणाऱ्या अधिकाऱ्यांचे ज्येष्ठता सूचीतील स्थान खाली जाणे अथवा पदावनत होणे या बाबी उद्भवू शकतात याचीही नोंद पदोन्नत अधिकाऱ्यांनी घ्यावी.

४. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्याला संबंधित विभागाने कार्यमुक्त करून या विभागास कळवावे. तसेच पदोन्नत अधिकाऱ्याने पदस्थापना दिलेल्या विभागात तत्काळ रूजू व्हावे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०६०११४२०००४०७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Imtiyaz Mushtaque Kazi

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=711589caceff9b0bb07e3c6556e724501d0c5ea5c63b3146314d51ec0e87d0a6, serialNumber=77a529748c5e7c1ba7a66e81c654ba3c492fda5b29e076241db1ba213ddedf4e, cn=Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2019.06.01 14:48:35 +05'30'

(इ.मु.काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

२. मा.मुख्यमंत्र्यांचे अ.मु.स.

३. अ.मु.स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

४. अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव- संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

५. सह / उप सचिव (आस्थापना),- संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

६. संबंधित अधिकारी, विभागामार्फत

७. निवड नस्ती १४